संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित व

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

# जे. डी. पाटील सांगळूदकर महाविध्यालय, दर्यापूर, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित उपक्रमांचा अहवाल

**सत्र २०१८-१९**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित जे. डी. पाटील सांगळूदकर महाविध्यालय, दर्यापूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० विध्यार्थी व विध्यार्थीनीचे पथक कार्यरत होते. **सत्र २०१८-१९ मध्ये रासेयो पथकाने नियमित कार्यक्रमांतर्गत** खालील विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले.

**<u>नियमित कार्यक्रमांतर्गत राबविलेले विविध तथा ठळक उपक्रम-</u>**

**१. महाविध्यालयात २०० वृक्षांचे रोपण.**
**३. मोफत दंत व मुखरोग तपासणी शिबीर.**
**४. रक्तदान शिबीर.**
**५. मोफत हृदयरोग तपासणी शिबीर.**
**६. मोफत कॅन्सर तपासणी शिबीर.**
**७. मोफत कान तपासणी व कर्णयंत्र वाटप शिबीर.**
**८. निराधार मुलांसोबत सामाजिक दिवाळी. नवीन कपडे वाटप.**
**९. सामाजिक रक्षाबंधन.**
**१०. निराधार मुलांसोबत सामाजिक होळी व रंगोत्सव.**
**११. पूर्णा नदी स्वच्छता अभियान.**
**१२. बस स्थानक सफाई अभियान**
**१३. मतदार नोंदणी व मतदार जनजागृती अभियान**
**१४. भव्य वक्तृत्व स्पर्धा**
**१५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा**
**१६ . महिला व बाल लैंगिक अत्याचार संबंधी कायदेविषयक मार्गदर्शन**
**१७. स्मशानभूमी स्वच्छता अभियान**
**१८. जलजागृती भारुड**
**१९. आठवडी बाजार स्वच्छता व कचरा व्यवस्थापन जनजागृती अभियान**
**२०. स्लम भागात स्वच्छता जनजागृती**

**<u>सविस्तर अहवाल-</u>**

- **<u>भारतीय संविधान उद्देशिका वाचन</u> -**

**दि.१३/६/२०१८ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सूचनेनुसार महाविध्यालयात प्रवेशित होणाऱ्या विध्यार्थ्यांसमोर सामुहिकपणे भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यावेळी विध्यार्थ्यांना आपले मुलभूत कर्तव्ये व अधिकाराबाबत अवगत करण्यात आले.**

- **आंतरराष्ट्रीय योग दिन**

**दि.२१/६/२०१८ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्य महाविध्यालयात सकाळी ७.०० वाजता भव्य योग शिबीर घेण्यात आले. निरोगी आयुष्य जगण्यासाठी जीवनाचा एक भाग असलेल्या योग शिबिरात राष्ट्रीय सेवा योजने सोबत पतंजली योग पीठ, दर्यापूर, गुड मॉर्निंग क्लब, एनसीसी, महाविध्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थी यात सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने यांनी आयोजन करून योग प्रशिक्षिक प्रा. संजय पवार व पतंजलीचे श्री रामेकर यांनी योग शिबिरात प्रशिक्षण दिले. यावेळी डॉ.साबळे, रमेश राऊत यावेळी उपस्थित होते.**

- **प्लास्टिक बंदी जनजागृती -**

**शासनच्या निर्देशानुसार महाविद्यालय परिसरात तथा सार्वजनिक जीवनामध्ये प्लास्टिकच्या विविध उत्पादनावर व वापरण्यावर घालण्यात आलेल्या बंदीचे सूचनाफलक दि. २८/६/१८ रोजी महाविद्यालयात दर्शनी भागात लावून त्याचे विमोचन प्राचार्य डॉ. राजपूत यांचे हस्ते व प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे यांचे उपस्थितीत करण्यात आले. यावेळी विध्यार्थ्यांमध्ये जनजागृती सुद्धा करण्यात आली.**

- **वृक्षारोपन -**

**महाराष्ट्र** शासनाच्या १३ कोटी वृक्ष लागवडीच्या आवाहनाला अनुसरून स्थानिक जे. डी. पाटील सांगळूदकर महाविध्याल्यात १ते ३१ जुलै २०१८ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दोनशे वृक्षांची लागवड करण्यात आली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व पालक संचालक डॉ. रामचंद्र शेळके व कार्यकारिणी सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे यांचे मार्गदर्शनात वृक्षारोपण करण्यात आले. महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे यांचे हस्ते वृक्ष लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी.व महाविद्यालयातील विध्यार्थी तथा प्राध्यापकांनी या वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेवून २०० वृक्षांची लागवड केली. नुकतेच भारतीय प्रशाषण सेवेत(**IAS**) निवड झालेले हेमंत भोरखडे यांचे हस्ते सुद्धा वृक्षारोपण करण्यात आले.

- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा -

**दि.२२/७/२०१८ रोजी गाडगेबाबा मंडळ व रासेयो, जे.डी.पाटील सांगळूदकर महाविध्यालयाच्या संयुक्त विध्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी नुकतेच आय.ए.एस. होऊन भारतीय प्रशासन सेवेत रुजू झालेले हेमंत भोरखडे, अमरावती व डॉ. पंजाबराव देशमुख आय.ए.एस. अकादमी, अमरावती चे संचालक डॉ. नरेशचंद्र काठोडे यांनी प्रशासकीय सेवेत जावू इच्छिणाऱ्या विध्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी अतिशय उपयुक्त ठरेल मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. गजानन भारसाकळे, प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, सहदेवराव भोरखडे, सौ. रेखा भओर्खाडे, सौ.रेवती भोरखडे व प्रशांत देशमुख उपस्थित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने यांनी सर्वांचे आभार मानले.**

## महाराष्ट्र शाषणाचा स्वच्छता पंधरवाडा १ ते १५ ऑगस्ट -

**दि.१ते१५/८/२०१७ दरम्यान** भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ भारत संकल्पनेनुसार व महाराष्ट्र शासनच्या आवाहनाला अनुसरून जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत **१ ते १५/८/२०१८** या दरम्यान स्वच्छता पंधरवाडा हे अभियान विविध उपक्रम घेवून राबविण्यात आले.

- **स्वच्छतेवर सेमिनार व व्याख्यान-**

दि.१ ऑगस्ट रोजी स्वच्छतेवर सेमिनार घेण्यात आला. इतिहास विभाग प्रमुख प्रा. रवि गावंडे व प्रा. राहुल गजभिये यांचे स्वच्छतेवर प्रमुख व्याख्यान यावेळी घेण्यात आले. त्यांनी शास्त्रशुद्ध पण सोप्या पद्धतीने स्वच्छतेच महत्व पटवून दिले. त्यानंतर रा.से.यो. च्या सर्व स्वयंसेवकांना व शिक्षकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

- **महाविद्यालयात स्वच्छता अभियान-**

दि.२ ते ५ ऑगस्ट दरम्यान चार दिवस महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाचा परिसर, क्रीडांगण, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, सभागृह, रस्ता, बगिच्याची साफसफाई करण्यात आली. परिसरातील गवत व गाजरगवत निर्मुलन करण्यात आले.

- **स्लम-झोपडपट्टी भागात स्वच्छता अभियान व कचरा व्यवस्थापन जनजागृती-**

दि. ६ ते १० ऑगस्ट २०१८ दरम्यान तीन दिवस स्लम-झोपडपट्टी भागात दारोदार जावून स्वच्छते संबंधी जनजागृती करण्यात आली. उघड्ड्यावर शौचास न जाता शासनाच्या योजनेचा लाभ घेऊन घरीच शौचालय बांधण्यासाठी व आपला परिसर स्वच्छ ठेवण्या संबधी व उघड्यावर कचरा न टाकता ओला व सुखा कचरा वेगळा करून काचारागादितच टाकावा यासाठी जनजागृती करण्यात आली. ‘परिसर स्वछ, उत्तम आरोग्य’, ‘घरोघरी संडास बांधा, गोदारीमुक्त गाव करा’. अशा उदघोषनेणे जनजागृतीकडे लोकांचे लक्ष वेधण्यात आले. दोन दिवस रा.से.यो. अंतर्गत स्लम-झोपडपट्टी भागात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात परिसरातील लोकांचा उत्स्फूर्त प्रतीसाद होता. महाविद्यालयातील युवक-युवती आपल्या परिसरात येवून स्वच्छता करतात या मध्ये आपणही सहभागी झालो पाहिजे अशी भावना या प्रसंगी व्यक्त होताना दिसत होती.

- **सरकारी उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छता अभियान-**

दि.११ ऑगस्ट दरम्यान सरकारी उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अतिशय गर्दीचे व लोक वर्दळीचे असलेले हे ठिकाण स्वच्छ करण्यात आले. गाव खेड्यावरून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना स्वच्छता ठेवण्यासाठी जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी रुग्णांची आस्थेनी विचारपूस करण्यात आली व रुग्णालय परिसर स्वच्छते संबंधी अवगत करण्यात आले.

- **स्वच्छता फेरी-**

१४ ऑगस्ट रोजी दर्यापूर शहरातून व झोपडपट्टी भागातून स्वच्छता फेरी काढून स्वच्छता जनजागृतीच्या उद्घोषणा देत लोकजागर करण्यात आला.

- **सैनिकांचे हस्ते वृक्षारोपण-**

दि.१५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वतंत्रता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे माजी विध्यार्थी असलेले भारतीय सैनिकांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेत रा.से.यो.चे स्वयंसेवक सक्रीयपने सहभागी होते. ध्वजारोहन व वृक्षारोपनानंतर प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे यांनी रा.से.यो.च्या विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्वच्छता पंधरवाडा अभियानाचा आढावा घेतला व असेच उपक्रम राबविण्याचे आवाहन केले.

- **क्रांती दिन-** दि.९/८/२०१८ रोजी महाविध्यालयात प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे यांचे मार्गदर्शनात रासेयो व एनसीसी तर्फे क्रांतीदिनाचे औचीत्यावर शहिदांना आदरांजली अर्पण करण्याकरिता क्रांतिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

- **सामाजिक रक्षाबंधन -**

दि.२७ ऑगस्ट २०१८ रोजी “सामाजिक रक्षाबंधन” अभिनव पद्धतिने साजरा करण्यात आले. देशाच्या सिमेवर सुरक्षेसाठी लढणाऱ्या भरतीय सैनिकांसाठी महाविद्यालयात सामाजिक रक्षाबंधन आयोजित करण्यात आले होते. समाजात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी निरंतर कार्यरत असणा-या पोलीस बांधवासाठी दर्यापूर पोलीस स्टेशन येथे रक्षाबंधन घेण्यात आले. बस स्थानक येथे जाऊन बसचे चालक व वाहक यांनाही राख्या बांधून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. खेड्यापाड्यावरून विद्यार्थ्यांची व प्रवाशांची ने-आन करून प्रवाश्यांच्या सेवेत राहणारे ऑटो चालक यांचेसाठी सुद्धा रक्षाबंधन आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाने सामाजिक बांधिलकी जोपासण्याची ज्योत-भावना विध्यार्थ्यांमध्ये तेवत राहावी व मानवता सदैव जोपासली जावी हाच उद्देश. यावेळी स्वच्छते व आरोग्याविषयी काळजी घेण्यासंबंधी जनजागृती सुद्धा करण्यात आली.

- **राठी ट्रस्ट कपडे वाटपात सहभाग -**

रतनलाल मथुरादास राठी ट्रस्ट तर्फे दरवर्षी गरजू मुलामुलींना कपड्याचे वाटप केले जाते. यावर्षी दि.२९/८/१८ ला राष्ट्रीय सेवा योजनेने सहभाग घेवून यावेळी वितरनात मदत केली. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने, पत्रकार शशांक देशपांडे, मयूर खेतान व गजानन देशमुख यांचे हस्ते कपडे वाटप करण्यात आले.

- **कॅन्सर तपासणी शिबीर -**

दि.२/९/२०१८ रोजी दर्यापूर परिसरातील गरजू रुग्णांसाठी एकता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,दर्यापूर, अमेरिकन ऑंकोलॉजी, नागपूर व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विध्यामाने मोफत कन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागपूर येथील डॉ. धनंजय बोकारे, डॉ. राजेश सिंघवी, डॉ. रमाकांत तायडे, डॉ. मनोज व्यवहारे यांनी ३५० रुग्णांची तपासणी केली. डॉ. इकबाल पठाण, डॉ अस्फिया पठाण व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने व रासेयो स्वयंसेवक यांनी शिबिराच्या यशस्वीते करिता व्यवस्थापन केले.

- **शिक्षक दिन -**

दि.५/९/२०१८ रोजी महाविध्यालयात रासेयो तर्फे शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे यांचे मार्गदर्शनात करण्यात आले. होते. यावेळी विध्यार्थ्याकडून शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सुद्धा मनोगते व्यक्त करून कृतज्ञता व्यक्त केली.

- **आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन व रासेयो उदबोधन कार्यक्रम -**

दि.८/९/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सुभाषराव भडांगे यांच्या मार्गदर्शनात आतरराष्ट्रीय साक्षरता दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगो डॉ. अविनाश जुमळे यांनी रासेयो हा महाविद्यालयीन स्तरावर सामाजिक उपक्रमाचा कणा असून समाजातील अनेक गोष्टीप्रति जागरूक राहून काम अरीत असते असे सांगितले. सामाजिक साक्षरता जनजागृती कार्यक्रमात अनेक अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा, अस्वच्छता, साक्षरता यासाठी पायिक होवून काम करण्याचा वसा घेतलेला युवक म्हणून स्वयंसेवकांकडे पहिले जाते असेही ते डॉ. अविनाश जुमळे म्हणाले बोलत होते. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. संजय आगलावे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने, डॉ नेत्रा तेल्हारकर उपस्थित होते.

- **<u>मातीचे गणपती बसवण्या करिता जनजागृती -</u>**

**दि. १२ सप्टेंबर २०१८ च्या दरम्यान शहरातील तथा खेड्यातील विविध मंडळाना भेटी देवून मातीचेच गणपती बसवण्यासाठी जनजागृती करण्यात आली. पर्यावरण संवर्धनांसाठी मंडळानी सहकार्य करण्याबाबत त्यांना आश्वस्त करण्यात आले. काही मंडळाला प्रातिनिधिक स्वरुपात मातीच्या मुर्त्या बनवून भेट देण्यात आल्या.**

- **<u>मातीचे गणपती प्रदर्शनी व जनजागृती</u>**

**गृहअर्थशास्त्र विभाग व रासेयो तर्फे विध्यार्थ्यांकडून मातीचे गणपती बनवून त्याची प्रदर्शनी महाविध्यालयात लावण्यात आली. महाविध्यालयीन शिक्षक व कर्मचारी यांनी आपल्या घरी बसवण्यासाठी ह्या मुर्त्या विकत घेवून पर्यावरण-पूरक उत्सव व रोजगार निर्मितीचा छोटेखानी प्रयत्न करण्यात आला. या निमित्याने मातीचेच गणपती बसवन्याबाबत जनजागृती करून पर्यावरणास हातभार लावण्याचा संदेश देण्यात आला.**

- <u>बाल व महिला लैंगिक अत्याचार संबंधी कायदेविषयक मार्गदर्शन</u> -

दि.२१/९/२०१८ रोजी महाविद्यालयीन तरुणाईला कायद्याचं मुलभूत ज्ञान असावं या करिता प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे यांचे मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने यांनी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व महिला सेल अंतर्गत बाल व महिला लैंगिक अत्याचार संबंधी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रसिद्ध विधिज्ञ एड. संतोष कोल्हे मार्गदर्शन करतांना म्हणाले की, समाज व्यवस्था चांगली राहावी, अन्याय अत्याचाराला प्रतिबंध बसावा व सामाजिक घडी सुरक्षित राहावी या करिता भारतीय संविधानाला अनुसरून भारतीय दंड संहिते अंतर्गत अनेक कायदे तयार करण्यात आले. बाल व महिला लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी सुद्धा असलेले अनेक कायदे कठोर करण्यात आले. परंतु प्रत्येक गोष्टीला कायदाच सुरक्षित ठेवू शकतो असे नाही तर त्या करिता माणसाची मनोवृत्तीच चांगली असणे महत्वाचे आहे असेही ते म्हणाले. याप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष म्हणून डॉ.अविनाश जुमळे, तर प्रमुख अतिथी म्हणून एड.आम्रपाली चौरपगार, डॉ. प्रफुल्लता कोलखेडे उपस्थित होते.

- **<u>रासेयो दिन</u> -**

**दि.२४/९/२०१८ रोजी रासेयो दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.** राष्ट्रीय सेवा योजना हे युवकांचे व्यासपीठ आहे. या चळवळीला समाजाभिमुख करून सामाजिक तथा युवकांच्या सर्वांगीण कलागुंनाना खुलवण्यासाठी व मूल्य रुजवण्यासाठी अनेक उपक्रम त्या माध्यमातून राबविले जातात. अभ्यासासोबत सामाजिक बांधिलकी ठेवून व्यक्तिमत्व विकसित करणारे व एक चांगला माणूस घडण्याचे संस्कार करून स्वस्थ भारतासाठी स्वस्थ युवक देणारे व्यासपीठ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना आहे असे प्रतिपादन येथील शिवाजी महाविद्यालय अकोट डॉ. अनंत सिरसाट यांनी केले. ते जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत आयोजित रासेयो दिन कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या प्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे, गाडगेबाबा मिशनचे संचालक व पत्रकार गजानन देशमुख रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने, डॉ. तेल्हारकर व्यासपिठावर उपस्थित होते.

- **पूर्णा नदी, टाकळी स्वच्छता अभियान-**

**दि. २७ सप्टेंबर २०१८ गणपती मंडळांना मातीचे गणपती बसवणे व निर्माल्य नदीत न टाकण्यासाठी जनजागृती करण्यात आली होती. गणपती उत्सवानंतर परिसरातील लोकांनी सर्व**

**निर्माल्यासह टाकळी येथील <u>पूर्णा नदीत</u> गणपती विसर्जन केले. या नदीतील पाणी गावातील शेतकऱ्यांची गुरेढोरे पितात त्यामुळे त्यांना बाधा पोहोचू शकते हा विचार घेवून व रासेयोच्या मुलभूत कर्तव्यानुसार स्वच्छता अभियांना अंतर्गत टाकळी परिसरातील पूर्णा नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. नदीतील निर्माल्य बाहेर काढून अर्धवट राहिलेल्या गणपती मुर्त्यांचे पुनर्विसर्जन रासेयो अधिकारी डॉ. नरेंद्र माने व व प्रा. राहुल सावरकर तथा रासेयो स्वयंसेवक व रसायनशास्त्र विभाग यांनी संयुक्तपणे केले.**

- **<u>आठवडी बाजारात स्वच्छता जनजागृती</u>**

**दि.२८/९/२०१८ रोजी आठवडी बाजारात जावून स्वच्छता ठेवण्यासंबंधी रासेयो पथकाने जनजागृती केली. विक्री नंतर आपला कचरा कचरा कुंडीतच टाकण्यासाठी असे आवाहन करण्यात आले.**

- **<u>शासकीय उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छता जनजागृती -</u>**

**दि.२९/९/२०१८ रोजी केअर फॉर सराउन्डीग अंतर्गत येथील शाषकीय उपजिल्हा रुग्णालयाला भेट देवून तेथील स्वच्छता करण्यात आली. या रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर यांचेशी स्वयंसेवकांनी चर्चा करून रुग्णालयातील कचरा व्यवस्थापनाची माहिती घेतली.**

- **<u>गांधी जयंती -</u>**

**दि.२/१०/२०१८ रोई महात्मा गांधीची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे, डॉ दीनदयाल ठाकरे यांनी मार्गदर्शन करतांना महात्मा गांधी यांचे जीवनावर प्रकाश टाकला. मराठी व रासेय विभाग अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

- **<u>नवीन मतदार नोंदणी अभियान</u>**

**दि.३/१०/२०१८ दरम्यान निवडणूक आयोगाकडून प्राप्त आवाहनानुसार व मार्गदर्शनात नवीन मतदार नोंदणीत सहभाग देवून नवीन मतदार होण्याकरिता जनजागृती करण्यासोबतच अनेक नवीन मतदारांची रासेयो कडून नोंदणी करण्यात आली. महाविध्यालय स्तरावर मोठ्या प्रमाणात हि मोहीम राबवून वयाची अट पूर्ण करणाऱ्या विध्यार्थ्यांना मतदार करून घेण्यात आले.**

- **<u>स्वच्छता मार्गदर्शन -</u>**

**दि.३/१०/१८ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव शेषराव खाडे यांनी रासेयोच्या विध्यार्थ्यांना स्वच्छतेसंबंधी मार्गदर्शन केले. वैकातिक स्वच्छतेसोबतच सामाजिक स्वच्छते करिता आपण सदैव कार्यरत राहावे असा संदेश त्यांनी दिला.**

- **रासेयोने राबविले दर्यापूर येथील हिंदू स्मशानभुमीत स्वच्छता अभियान**

**दि.३ ऑक्टोबर २०१८**

जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी बाभळी येथील हिंदू स्मशानभुमीत नुकतेच उत्स्फुर्तपणे स्वच्छता अभियान राबविले. दर्यापुरची बाभळी येथील स्मशानभुमी हिंदूचे मुख्य मोक्षधाम म्हणून ओळखले जाते. इहलोकीच्या प्रवासाला गेलेल्या माणसाला शेवटचा निरोप या मोक्षधामात दिला जातो. एरवी दुर्लक्षित असलेली हि स्मशानभुमी झाडपाला, कचऱ्याने अस्वच्छ असते. हि बाब लक्षात घेवून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नरेंद्र माने, प्रा.डॉ. नेत्रा तेल्हारकर यांनी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत राष्ट्रीय सेवा

योजनेच्या स्वयंसेवकांना सोबत घेवून येथे स्वच्छता अभियान राबविले. स्वयंसेवकांनी या स्मशानभुमी परिसराची स्वच्छता केली.

- **<u>झोपडपट्टी भागात आहार व व्यसनमुक्ती जनजागृती</u> -**

**दि.५/१०/२०१८ रोजी** योग्य तथा वेळेवर आहार घेवून व व्यसनांपासून दूर राहून चांगलं आयुष्य जगता येते. तोकड्या कमाईत व्यसनावर होणारा खर्च कुटुंबाच्या प्रगतीसाठी मारक ठरून मुलांवर सुद्धा त्याचे वाईट परिणाम करणारा ठरतो. तसेच आपल्या भागाची स्वच्छता करण्यासाठी स्वतः पुढाकार घेण्याकरिता जनजागृती करण्यासाठी येथील जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने शिवर जवळ असलेल्या झोपडपट्टी भागात आहार, व्यसनमुक्ती तथा स्वच्छते बाबत जनजागृती अभियान राबवून स्वच्छता व स्वास्थ्य याबाबत हृदयस्पर्शी संवाद साधण्यात आला. या प्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने, गृहअर्थशास्त्राच्या प्रा. डॉ. ज्योस्त्ना पुसाटे व प्रा. सौ. माधुरी बिजवे यांनी आरोग्य व आहार याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. संगीता भुयार, प्रा.डॉ. नेत्रा तेल्हारकर व प्रा. रंजना कदम यांनी सुद्धा कौटुंबिक व स्नेहपूर्ण संवाद करून तेथील महिला व मुलींच्या समस्या जाणून मार्गदर्शन केले.

- **<u>जागतिक मानसिक आरोग्य दिन-</u>**

**दि.१०/१०/२०१८ रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्य विध्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी व समाजातील विकलांगांन्ना सहहृद्यतेची वागणूक मिळण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रवृत्त होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा.डॉ.अविनाश जुमळे व प्रा.डॉ. ज्योस्त्ना पुसाटे यांनी विध्यार्थ्यांना औचित्यपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विध्यार्थी उपस्थित होते.**

- <u>अंबा फेस्टिवलच्या वक्तृत्व स्पर्धेत रासेयोचा सहभाग -</u>

दि.१२/१०/२०१८ रोजी महाविद्यालयीन स्तरावर अंकुरत असलेल्या युवा वक्त्यांसाठी अंबा फेस्टिवल अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचा सहभाग देवून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पन्नास वक्त्यांनी विविध विषयावरून आपल्या वक्तृत्वाची चुणूक दाखवत विषयाची अभ्यासपूर्ण व उत्तम मांडणी करत सर्वांची मने जिंकली. स्वच्छता अभियान, आरोग्य, सामाजिक स्वास्थ तथा जवळपास सर्वच क्षेत्राशी संबंधित विषय घेवून प्रत्येकाला वेगळा विषय देण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावतीची विध्यार्थीनी कु. आकांक्षा अविनाश असणारे, तर द्वितीय क्रमांक पुष्पक लोहीतकर, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर व तृतीय क्रमांक भाग्यश्री कांबळे, विध्याभारती महाविद्यालय, अमरावती यांनी पटकावला. सर्व विजेत्यांना रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेचे संयोजक प्रा.शीतल तायडे, रामकृष्ण महाविद्यालय दारापूर, सहसंयोजक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर व राजर्षी शाहू महाराज विज्ञान महाविद्यालय, चांदूररेल्वे हे होते.

- <u>अंध दिनानिमित्य अंध मुलांशी संवाद व फळवाटप</u> -

जागतिक अंध दिनानिमित्य महाविध्यालयीन मुलांच्या सामाजिक जाणीव विस्तारल्या जाव्या यासाठी अंध मुलांसोबत संवाद व फळवाटप कार्यक्रम दर्यापूर यथील स्व.बिजवे अंध विध्यालयात जाऊन घेण्यात आला.

- **मोफत दंत व मुखरोग तपासणी शिबीर -**

**दि.१७/१०/२०१८ रोजी महाविध्यालयीन विध्यार्थ्यांसाठी मोफत दंत व मुखरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. वसिम घानिवला यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन करतांना दाताची निगा कशी राखावी, हाताची स्वच्छता कशी ठेवावी याबाबत माहिती सांगितली. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची, शिक्षकांच्या व कर्मचाऱ्यांची मोफत दंत व मुखरोग तपासणी करून ज्यांना दातांच्या समस्या निघाल्यात त्यांचे पुढील उपचार सुद्धा त्यांनी करण्याचे आश्वासन दिले.**

- **राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम -**

**दि.२६/१०/२०१८ रोजी ग्रामीण रुग्णालय दर्यापूर राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत प्राथमिक तपासणी शिबिराचे आयोजन सूक्ष्मजीवशास्त्र व रासेयो अंतर्गत करण्यात आले होते.**

- एकता दौड -

सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्य दि.३१/१०/२०१८ रोजी दर्यापूर शहरातून अनेक सामाजिक संस्थांच्या सहभागातून एकतेचा संदेश देणाऱ्या एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांनी सहभागी होऊन सक्रियपणे सामाजिक एकतेचा संदेश पोहोचवण्यासाठी मदत केली.

- निराधार मुलांना कपडे वाटून सामाजिक दिवाळी साजरी -

दि.६/११/२०१८ रोजी गाडगेबाबा निराधार बालक आश्रमात जाऊन निराधार मुलांसोबत सामाजिक दिवाळी साजरी करण्यात आली. त्या निराधार मुलांना नवीन कपड्यांसोबतच त्यांना दिवाळीनिमित्य गोड पदार्थाचेसुद्धा वाटप करण्यात आले. निराधार असल्यामुळे एरवी संनाच्या आनंदाला मुकणाऱ्या निराधार मुलांचा सहवास रासेयो स्वयंसेवकाला मिळावा व त्यांच्या सामाजिक संवेदना सचेत राहाव्या व सामाजिक स्वास्थ टिकावं याकरिता यावर्षी अशा प्रकारे सामाजिक दिवाळी साजरी करण्यात आली. महाविध्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक , कर्मचारी तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे विध्यार्थी यात सहभागी झाले होते.

- मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा -

दि.२३ ते २५ नोव्हेंबर २०१८ असे तीन दिवस एकता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, दर्यापूर व सरकार अकादमी, नाशिक व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने तर्फे मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. ज्याचे अभ्यासाप्रती पूर्ण समर्पण व काटेकोर नियोजन असेल त्याचा स्पर्धा परीक्षामध्ये निभाव लागतोच. म्हणून समर्पण व नियोजन हे अत्यंत महत्वाचे असून त्यामध्ये तडजोड करू नये असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत महाराष्ट्रातून प्रथम आलेल्या तथा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याच्या कार्यालयातील कक्ष अधिकारी असलेले किरण पाटील यांनी केले. या कार्यशाळेच्या पहिल्या दिवसीय सत्रात त्यांनी अनेक विषयाचे मार्गदर्शन केले. एकता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. इक्बाल पठाण,

सरकार अकादमी नाशिकचे संचालक प्रा. रवींद्र सरकार, तहसीलदार अमोल कुंभारे, प्रा. गजानन भारसाकळे, ठाणेदार मुकुंद ठाकरे, आगार व्यवस्थापक इंगोले यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत प्रा. रवींद्र सरकार यांनी दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करून विध्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले तथा स्पर्धा परीक्षेचे बारकावे विषद केले. यावेळी विध्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची उपयुक्त पुस्तके अर्ध्या किमतीत उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यशाळेकरिता डॉ.इकबाल पठाण व डॉ. नरेंद्र माने यांनी मेहनत घेतली.

- मोफत हृदयरोग तपासणी शिबीर -

दि.२५/११/२०१८ रोजी दर्यापूर येथील एकता मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल व नर्सिंग होम, क्रीसेंट हॉस्पिटल व हार्ट सेंटर, नागपूर व राष्ट्रीय सेवा योजना, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर यांचे संयुक्त विध्यमाने मोफत हृदय रोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला दर्यापूर परिसरातील रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. २०० रुग्णांची हृदयरोग तपासणी सोबतच ईसीजी तथा रक्तांच्या तपासण्यासुद्धा मोफत करण्यात आल्या. नागपूर येथील क्रीसेंट हॉस्पिटल व हार्ट सेंटरचे संचालक व प्रख्यात हृदयरोग तज्ञ डॉ. अझीज खान व डॉ. काशीफ सय्यद तथा डॉ. दीपक यादव, डॉ. हरीस, डॉ. इरफान, डॉ. इमरान पठाण, डॉ. आतिक, डॉ. युनुस, डॉ. अन्सार अली यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना पुढील मार्गदर्शन केले. सुरुवातीला या शिबिराचे औपचारिक उद्घाटन जी.प. चे आरोग्य तथा वित्त सभापती बळवंतराव वानखडे यांचे हस्ते करण्यात आले. या शिबिराच्या आयोजनासाठी डॉ.इक्बाल पठाण व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने यांनी मेहनत घेतली.

- <u>गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्य बसस्थानक स्वच्छता अभियान</u>-

**दि.२१/१२/२०१८ रोजी गाडगेबाबांच्या पुण्यतिथी निमित्य बसस्थानकाची स्वच्छता करून गाडगेबाबांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सुरुवातीला आगार व्यवस्थापक यांचे हस्ते गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली अर्पण करण्यात आली. नंतर संपूर्ण बसस्थानक परिसराची स्वच्छता करण्यात आली.**

- <u>रक्तदान शिबीर</u> -

**दि.२४/१२/२०१८ रोजी स्व.मदनराव गावंडे स्मृती रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे महाविध्यालयात करण्यात आले होते. या शिबिरात सुनील गावंडे, प्रभाकर कोरपे, प्रभाकर तराळ, अड. अभिजित देवके यांचे सह गावातील नागरिक तथा विद्यार्थी अशा २२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय रक्तपेढीच्या डॉक्टरांच्या चमूने रक्त संकलित कण्यास सहकार्य केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन देशमुख, कार्यकारिणी सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे, मा.हेमंतराव काळमेघ, डॉ.पद्माकर सोमवंशी, डॉ.दिनकरराव गायगोले, जयप्रकाश भुतडा यांनी भेट देवून या उपक्रमाचे कौतुक केले. प्राचार्य. डॉ.सुभाष भडांगे व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने यांनी या शिबिरासाठी मेहनत घेतली.**

- <u>स्वच्छता जनजागृती फेरी</u> -

दि.२७/१२/२०१८ रोजी स्व.डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंत्युत्सवानिमित्य शहरातून स्वच्छता फेरी काढून रासेयो स्वयंसेवकांनी स्वच्छतेसोबतच सामाजिक ऐक्याचा उदघोष करून सामाजिक एकता अखंड ठेवून सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच संदेश विविध पथनाट्ये, राष्ट्रपुरुषांचे संदेश सदर करून दिला.

- <u>रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्य पथनाट्य सादरीकरण</u> -

पोलीस विभागाकडून राबविण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्य दि.८/१/२०१९ रोजी रस्त्यावरून वाहन चालवितांना खबरदारी घेणे व संभाव्य अपघात टाळण्यासाठी जनजागृती करण्याकरिता रासेयोच्या स्वयंसेवकांनी शहरातील विविध गर्दीच्या चौकात पोलीस बांधवांच्या सहकार्याने पथनाट्य सादर करून जनजागृती करण्याचे काम केले.

- युवक दिन -

दि.१२/१/२०१९ रोजी स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्य युवक दिन महाविध्यालयात साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे, डॉ मिलिंद भिलपवार, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने तथा विद्यार्थ्यांनी युवकांना संदेश देणारे मनोगत याप्रसंगी मांडले.

- सामाजिक ऐक्याचे संदेश देणारे संगीतमय पथनाट्य -

युवकांवर नैतिक संस्कार व्हावा तथा सामाजिक व धार्मिक ऐक्य टिकवण्याचा संदेश देणासाठी वारकरी संप्रदायाचा आधार घेवून सुंदर संगीतमय पथनाट्य महाविद्यालयातील विध्यार्थ्यांसमोर वार्षिकोत्सवात दि.१५/१/२०१९ रोजी सादर करण्यात आले. एरवी चित्रपटाच्या गाण्यावर थिरकणारी तरुणाईने या सादरीकरनाला प्रचंड प्रतिसाद दिला.

- उमरी मंदिर यात्रा परिसर स्वच्छता अभियान -

संत वियोगी महाराज जन्मोत्सावानिमित्य दर्यापूर तालुक्यातील उमरी मंदिर येथे १८ व १९ जानेवारी असे दोन दिवस भव्य यात्रा भरते. यात्रेचे स्वरूप दरवर्षी भव्य दिव्य असल्यामुळे हजारोंच्या संख्येने लोक येतात. यात्रेकरूंसाठी संस्थान तर्फे महाप्रसादाचे सुद्धा आयोजन करण्यात येते. यात्रा संपल्यानंतर हा परिसर कचऱ्याने व्यापून जातो. अस्वच्छ झालेल्या परिसराची जे. डी. पाटील सांगळूदकर महाविध्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने यांचे मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाने दि.२०/१/२०१९ रोजी या संपूर्ण परिसरात स्वच्छता अभियान राबवून प्रत्यक्ष कृतीतून गाडगेबाबांचा संदेश साकारण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला.

- कुंभारगाव यात्रा परिसर स्वच्छता अभियान -

तालुक्यातील कुंभारगाव येथे दरवर्षी स्थानिक संस्थांनच्या वतीने यात्रेचे आयोजन करण्यात येते. यात्रा संपल्यानंतर ह्या परिसरात झालेल्या कचऱ्याची दखल घेवून जे. डी. पाटील सांगळूदकर महाविध्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने यांचे मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थानिक तथा परिसरातील जवळच्या स्वयंसेवकांनी गावातील शाळेच्या विध्यार्थ्यांना सोबत घेवून दि.२५/१/२०१९ रोजी या संपूर्ण परिसरात स्वच्छता अभियान राबवून प्रत्यक्ष कृतीतून गाडगेबाबांचा संदेश साकारण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला.

- **राष्ट्रीय मतदार दिना निमित्य सेमिनार -**

**दि.२५/१/२०१९ रोजी राष्ट्रीय मतदार दिना निमित्य विध्यार्थ्यांचे मनोगत घेवून जनजागृती करण्यात आली. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्य आयोजित या मतदार नोंदणी जनजागृती कार्यक्रमात प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे यांनी मतदार नोंदणी हे सुद्धा राष्ट्रकार्य असून ते करण्याचे आवाहन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने, प्रा. डॉ. नेत्रा तेल्हारकर, डॉ.संगीता भुयार तथा प्राध्यापक व विध्यार्थी उपस्थित होते. यावेळी वोटिंग मशीन व्हीव्हीपॅडची माहिती सुद्धा देण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार गाडेकर व राजगुरू यांनी मार्गदर्शन केले.**

- <u>रासेयोच्या जलजागृती भारुडाचा शासकीय कार्यक्रमात गौरव</u>

'जल है तो कल है' हि जान सर्वांना असतांना सुद्धा पाण्याचा अपव्यय होतांना दिसतो. पाण्याच्या दुर्भिक्षामुळे जिवश्रुष्ठीच अस्तित्वच धोक्यात येवू पाहते आहे. याकरिता वेळेत जागृत होणे अतिशय आवश्यक आहे. शासन स्तरावर वेळोवेळी जनजागृतीही करण्यात येते. हाच जलजागृतीचा विषय घेवून स्वस्थ भारत अभियानाला अनुसरून व राष्ट्रीय सेवा योजनेची सामाजिक बांधिलकी जोपासत जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने यांचे मार्गदर्शनात स्वयंसेवकांनी **<u>'पाणी हरवलं कोणी ते चोरलं'</u>** हा जलजागृतीचा संदेश देण्यासाठी भारुड तयार केले. मनोरंजनातून जलजागृती करण्याकरिता व पाण्याच्या निर्माण होणाऱ्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी नुकतेच दि.२६/१/२०१९ ला प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात हे भारुड साभिनय सादर करत पाण्याच्या संवर्धनाचा संदेश सर्वांपर्यंत पोहचवण्याच्या प्रभावी प्रयत्न करण्यात आला. विविध शाळा महाविद्यालयाचे विध्यार्थी, पालक, गावातील नागरिक, सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी तथा विविध विभागाचे पदाधिकारी यांचे उपस्थितीत अतिशय प्रभावीपणे सादर झालेल्या या भारुडाचे प्रचंड कौतुक करण्यात आले. तहसीलदार अमोल कुंभार, नगर परिषद मुख्याधिकारी तथा ठाणेदार मुकुंद ठाकरे तथा इतर अधिकारी यांनी उत्स्फुर्तपणे रासेयोच्या सर्व सहभागी स्वयंसेवकांचा गौरव केला.

- **<u>मतदान जनजागृती -</u>**

**दि.२८/१/२०१९ रोजी मतदार जनजागृती करिता एकता हॉस्पिटल, दर्यापूर येथे आरोग्य शिबिराच्या निमित्याने खेड्यापाड्यातून आलेल्या रुग्णांसमोर मतदानाचे महत्व सांगणारा संदेश रासेयो स्वयंसेवकांनी देवून मतदान जनजागृती केली. यावेळी तहसीलदार तथा त्यांची चमू यांनी मतदान मशीनचे प्रात्यक्षिक लोकांना दाखविले. यावेळी डॉ.पठाण, पत्रकार गजानन देशमुख, डॉ. कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र माने गावातील नागरिक तथा विध्यार्थी उपस्थित होते.**

- **<u>मोफत कान तपासणी व कर्णयंत्र वाटप शिबीर</u> -**

शरीराचा अत्यंत महत्वाचा अवयव असलेल्या कानांची निगा न घेतल्यामुळे किंवा वयोमानानुसार आलेली कर्णबधिरता याकरिता दर्यापूर येथील एकता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व नर्सिंग होम, सिटी हॉस्पिटल, अकोला व राष्ट्रीय सेवा योजना, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विध्यमाने मोफत कान तपासणी, मार्गदर्शन व कर्णबधिरांना कर्णयंत्र वाटप करण्याकरिता दि.२८/१/२०१९ रोजी भव्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. दर्यापूर परिसरातील आर्थिक दुर्बल असलेल्या ज्या रुग्णांना पूर्णता: किंवा अंशतः कर्णबधिरता आहे अशा पंच्यांशी रुग्णांची ऑडीओमेट्रिक तपासणी यावेळी डॉ. योगेश गावंडे, डॉ. विनोद रामटेके व डॉ.संतोष पाटील यांनी केली. त्या रुग्णांना महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत कर्णयंत्र वाटप करण्यात आले. डॉ.इक्बाल पठाण, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने यांनी विशेष परीषम घेवून या शिबिराचे आयोजन केले होते.

- <u>ऋणमोचन येथे वस्त्रदान व अन्नदान कार्यक्रमात सहभाग</u> -

गाडगेबाबांची कर्मभूमी म्हणून ओळखल्याजानारे ऋणमोचन येथे दरवर्षी वस्त्रदान व अन्नदान भव्य प्रमाण करण्यात येते. लाखोंच्या संख्येने गरीब, दिन, दलित, विकलांग लोक यावेळी उपस्थित असतात. यावर्षी दि.३/२/२०१९ रोजी त्यांना अन्नदान व वस्त्रदान करण्याकरिता प्राचार्य

डॉ.सुभाष भडांगे व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने व रासेयो स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेवून गाडगेबाबांच्या सेवाकार्यात सहभाग घेतला.

- जागतिक महिला दिनानिमित्य सैनिकाच्या परिवाराचा गौरव -

दि.८/३/२०१९ रोजी जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व महिला सल्लागार समितीच्या संयुक्त विध्यमाने करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.अपर्णाताई धोत्रे, अकोला व सौ.उज्वलाताई भडांगे, प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे, भारतीय सैनिक तथा त्यांच्या परिवारातील महिला सदस्य उपस्थित होत्या. यावेळी देशासाठी सिमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या माता व पत्नींचा साडी चोळी देवून सन्मान करण्यात आला. काही सैनिक मातांनी यावेळी गौरवगीत सुद्धा सदर करून आपल्या भवन व्यक्त केल्यात. यावेळी डॉ.मृणाल कडू, डॉ.प्रफुल्लता कोलखेडे, डॉ.नेत्र तेल्हारकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने तथा इतर प्राध्यापक, कर्मचारी, विध्यर्थी व सैनिक परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- निराधार मुलांना पुरणपोळीचे जेवण देवून साजरी केली सामाजिक होळी -

सर्वसाधारणपणे प्रत्येक सण हा प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद आणणारा क्षण असतो. त्यादिवशी गोडधोड, नवीन कपडे खरेदी करणे अशा स्वरुपात तो मनवल्या जातो. परंतु आईवडील नसलेले निराधार मुलं या आनंदापासून वंचित राहतात. हीच संवेदना घेवून रासेयो तर्फे सामाजिक होळी यावर्षी गाडगेबाबा निराधार बालक आश्रमातील मुलांना पुरणपोळीचे जेवून देवून त्यांचे सोबत रंगोत्सव खेळून अभिनव पद्धतीने साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नरेंद्र माने यांनी पुढाकार घेवून व महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी यांनी सहकार्य करून रासेयो विध्यार्थ्यांना या अनाथ मुलांच जीवन कळाव व त्यांच्या मध्ये सामाजिक स्वास्थाच्या संवेदना सचेत राहाव्या याकरिता अनाथ मुलांसोबत साजरी केलेली सामाजिक होळी त्यांना आनंद देवून गेली.

- जागतिक जलदिनानिमित्य जलजागृती उदबोधन -

दि.२२/३/२०१९ रोजी जागतिक जल दिनानिमित्य महाविद्यालयात जलजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा.डॉ.ए.के.बोडखे यांनी पाणी संधारनासंबंधी माहिती सांगतांना प्रत्येकाने पाण्याचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे असा संदेश दिला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.ए.एम.जुमळे यांनी सुद्धा समर्पक मार्गदर्शन करत जीवाप्रमाणे पाण्याला जपा नाहीतर आपली जीवाश्रुष्ठी पाण्याअभावी धोक्यात येवू शकते असे सांगितले. प्रा.डॉ.ए.पी.चांदुरकर, डॉ.मंगला पांडेय, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.नरेंद्र माने, प्रा.आगलावे, प्रा.डॉ.भिलपावर व विध्यार्थी उपस्थित होते

विशेष नैपुण्य -

- विद्यापीठ स्तरीय व अमरावती जिल्हा स्तरीय पुरस्कार -

राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यापीठ स्तरीय व अमरावती जिल्हा स्तरीय उत्कृष्ठ महाविद्यालय म्हणून **'स्वच्छ भारत - स्वस्थ भारत अभियान पुरस्कार' या दोन पुरस्काराकरिता महाविध्यालयाची निवड** होवून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी प्रदान करून दि.१४/९/१८ रोजी सन्मानित केले.

- **प्रा.डॉ.नरेंद्र माने यांची** राष्ट्रीय साहस शिबीरा करीता **निवड-** पोंगडॅम, हिमाचल प्रदेश येथे झालेल्या १० दिवसीय राष्ट्रीय साहस शिबीराकरिता डॉ. नरेंद्र माने,कार्यक्रम अधिकारी यांची संत गाडगेबाबा अमरावती विध्यापीठाचे टिम लिडर म्हणून निवड (दि.२८/१०/१८ ते ६/११/१८)

- **विध्यार्थ्यांची निवड -**

**१. राष्ट्रीय एकात्मता शिबीर(एन.आय.सी.कॅम्प), तेलंगना करिता २ रासेयो स्वयंसेवकाची निवड.(१५ ते २१ डिसेंबर २०१८)**

**१.अक्षय विलास खंडारे(बी.ए.३) २.कु.राणी अशोक गोरले(बी.ए.३)**

**२. राष्ट्रीय एकात्मता शिबीर(एन.आय.सी.कॅम्प),भोपाल करिता २ रासेयो स्वयंसेवकाची निवड.(१० ते १६ मार्च २०१९)**

**१.महेश किसान बुंदे(बी.कॉम.२) २.कु.हर्षली धनराज फुकट((बी.ए.१)**

**३. राज्यस्तरीय साहस शिबीर, चिखलदरा करिता ४ रासेयी स्वयंसेवकांची निवड. (दि.२९/१ ते २/२/२०१९)**

**१. अक्षय विलास खंडारे(बी.ए.३) २. महेश किसान बुंदे(बी.कॉम.२)**

**३. अक्षय बंडूपंत धांडे(बी.ए.२) ४. कु.राणी अशोक गोरले(बी.ए.३)**

**४. प्रेरणा-राज्यस्तरीय नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबीर, संगाबाअवि, अमरावती करिता ५ रासेयो स्वयंसेवकांची निवड- (दि.२३ ते २७ फेब्रुवारी २०१९)**

**१.प्रज्वल रामेश्वर काकड(बी.कॉम.२) २. महेश किसान बुंदे(बी.कॉम.२)**

**३.पंकज नीरज मंदवारे(बी.ए.१) ३. अभिजित दादाराव इंगळे(बी.ए.१)**

**५. कु. काजल दिगंबर काळे(बी.ए.१)**

**५. विभागीय युवा प्रशिक्षण शिबीर, अमरावती करिता २ रासेयो स्वयंसेवकांची निवड- (दि. २३/७ ते १/८/२०१८)**

**१.आनंद राजेश ठाकरे(बी.कॉम.३) २. कु.राणी अशोक गोरले(बी.ए.३)**

**६. विध्यापिठस्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळा, संगाबाअवि, अमरावती करिता ४ रासेयो स्वयंसेवक मुलींची निवड- (दि.२५ ते २७ मार्च २०१९)**

**१. कु. दीपिका किशोर कावरे(बी.ए.१) २. कु. काजल दिगंबर काळे(बी.ए.१)**

**३.कु.अमृता अरुण स्वर्गीव(बी.ए.२) ४. कु. मुक्ता गजानन लोंधे(बी.ए.२)**

**७. अमरावती जिल्हा विशेष शिबीर, शेंडगाव करिता ६ रासेयो स्वयंसेवकांची निवड- (दि.१७ ते २४ डिसेंबर २०१८)**

**१.कु.निकिता शिवशंकर डिके((बी.ए.२) २. कु.अमृता अरुण स्वर्गीव(बी.ए.२)**

**३. महेश किसान बुंदे(बी.कॉम.२) ४. अक्षय बंडूपंत धांडे(बी.ए.२)**

**५. कु.निकिता राजेंद्र घुरडे(बी.ए.२) ६. विक्की संजय लव्हाळे((बी.ए.२)**

**८. श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व युवक बिरादरी यांच्या संयुक्त विध्यमाने महाविध्यालयात राबविलेल्या युवा भूषण स्पर्धेत रासेयोचा २ स्वयंसेवकांची निवड-**

**१. सुमित सुधाकर आंबूसकर २. कु राणी अशोक गोरले**

९. महाविद्यालयातील सर्व विध्यार्थ्यांमधून उत्कृष्ठ विद्यार्थी म्हणून निवडल्या गेले रासेयोच्या २ स्वयंसेवक-

१. सुमित सुधाकर आंबूसकर २. कु राणी अशोक गोरले